**माहे ऑगस्ट २०२४ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर शहर | रॉकी (बेल्जीयन शेफर्ड) | पोलीस हवा./११९६ पी.जी.सोनुने | दौलताबाद पो. स्टे. छत्रपती संभाजीनगर शहर गु. र. नं. १६०/२०२४ भा.न्या.सं.कलम ३०९ (६) प्रमाणे गुन्हा दाखल असुन गुन्हयाच्या घटनास्थळी एक चप्पल जोड त्यावर रक्ताचा डाग असलेली मिळून आल्याने त्याचा वास श्वान रॉकीस देवुन सोडले असता श्वानाने अंजीराच्या शेतातुन माग काढीत मक्याच्या उभ्या असलेल्या पिकात अंदाजे १०० ते १५० मीटर गेल्यानंतर समृध्दी महामार्गाच्या उत्तर बाजुस पायवाटेने पश्चिमेस अंदाजे ८०० ते ९०० मीटर माग काढीत दक्षिण-उत्तर असलेला धुळे-सोलापुर महामार्गाच्या बाजुला येवुन घुटमळुन थांबत असल्याने परत वरिल वस्तुचा वास श्वान रॉकीस देऊन सोडले असता उत्तरेस धुळे-सोलापुर महामार्गाच्या सर्वीस रोडने माळीवाडा गायरान जमीनी पर्यंत अंदाजे ५०० ते ६०० मीटर जावुन तेथे असलेल्या दोन ते तीन झोपडयांमध्ये व त्यांचे आजुबाजुला जावुन घुटमळुन थांबत असल्याने तेथे खाली जमीनीवर बसलेल्या मुलांना अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी त्याचे नाव सतीश बस्वराज पवार अंदाजे वय-१६ वर्षे व कृष्णा बस्वराज पवार वय-१७ वर्षे असे सांगीतले नमुद आरोपीतांस अटक केली आहे. व त्यांनी गुन्हयाची कबुली दिली आहे. व त्यांचेकडून गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.<br>अशा प्रकारे गुन्हा उघडकीस आणणेकामी श्वान रॉकी व त्याचे हस्तकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |




| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | रत्नागिरी | माही डॉबरमन | १) पोहवा/१२५५ एस.एस.सावंत<br>२) पोहवा/३७६ जे.के.जाधव | सावर्डे पोलीस ठाणे गु.र.नं.७५/२०२४ बीएनएस कलम १०३, ३११, ३३३ हा गुन्हा गोसावेवाडी नांदगाव खुर्द सावर्डे, ता.चिपळूण जि.रत्नागिरी या ठिकाणी घडला होता सदर गुन्हयाचे तपासकामी घटनास्थळी अज्ञात आरोपीने गुन्हा करणे करीता किचनमधील सिलेंडरचे टाकीचा वापर केला होता. सदरचे सिलेंडर टाकीचे बाजूला अज्ञात आरोपीत याचा एका कानातील बोट कंपनीच एअर बर्डस (राखाडी रंगाचा) गुन्हा करताना पडलेला होता. सदरचे एअर बर्डसचा वास श्वान माही हीस दिला असता श्वान माही ही घटनास्थळावरून वास घेत पुर्वेकडील दिशेने सुमारे ६० मीटर अंतरावरील असुर्डे ते नांदगाव जाणा-या मुख्य डांबरी रस्त्यावर उभे असलेल्या लोकांमध्ये श्वान माही वास घेत गेली श्वान माही एका इसमा जवळ अंगावर भुंकू व घुटमळू लागली.<br>श्वान करीत असलेल्या इशा-यावरून श्वानास देण्यात आलेल्या बोट कंपनीचा एअर बर्डस वास हा स्वप्नील परशुराम खातू, वय ४६ रा.गोसवेवाडी नांदगाव खुर्द सावर्डे ता.चिपळुण जि.रत्नागिरी याचाच असल्याने त्याचेकडे तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले आहे.<br>अशा प्रकारे सदर गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने श्वान माही व त्याचे श्वान हस्तकांनी महत्वाची कामगिरी केलेली आहे. |




| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | पुणे शहर | रूद्र डॉबरमन | १) पोलीस उप निरीक्षक इम्रान पटेल<br>२) पो.ना. ७४८६ नितीन पांडरंग जगताप | लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे शहर अकस्मात मयत रजिस्टर क्र. १९६/२०२४ मधील घटनास्थळावरून जप्त करण्यात आलेल्या मयत इसमाच्या मोबाईलचा वास श्वान रूद्र यास दिला असता. तो तेथे असलेल्या उसाच्या बाजूला उंच गवतात आत वास घेत गेला असता मयत इसमाचे तेथे प्लॅस्टिक कृत्रिम पाय व रबरी चप्पल मिळून आले.<br>अशा प्रकारे दाखल अकस्मात मयतामध्ये श्वान रूद्र याने श्वान हस्तक पो. ना. ७४८६ जगताप व त्यांना मार्गदर्शन करणारे इम्रान पटेल पो.उप निरी. यांनी महत्वपुर्ण कामगिरी बजावली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | कोल्हापुर | बेली बेल्जीयम मेलेनॉईज | १) पोहवा/२१७५ माने<br>२) पोकाँ / १७७३ झेंडे | शिरोली एम आय डी सी गु.र.नं. १३६/२०२४ भा.न्या.सं. कलम १३६ (२) हा गुन्हा दि.२१/८/२०२४ रोजी दाखल असून सदर गुन्हाचे घटनास्थळी अपहरीत मुलगी कु. शिवानी गुडडूसिंह अग्रहरी, वय १० वर्षे रा.सध्या रामनगर, शिये करवीर, कोल्हापुर हिचे शोध घेण्याकामी श्वानपथक कोल्हापुर यांना पाचारण केले असता श्वान बेली हीस अपरहरीत मुलीचे वापरलेले कपडयाचा वास देवुन सोडले असता ती घरासमोर फिरून घराबाजुचे बोळवजा रस्त्याने घराचे पाठीमागील बाजूस येवून ती पश्चिम दिशेने सरळ डांबरी रोडवर आली तेथुन दक्षिण दिशेस पुर्व पश्चिम वाहणा-या ओढयाजवळ अपहरीत मुलगी पडलेल्या ठिकाणी श्वान बेली थांबली. तेथे असलेले नातवाईकांनी सदरची मुलगी ही अपहरीत कु.शिवानी हि असल्याचे सांगीतले.<br>तरी सदर गुन्हयामध्ये अपहरीत मुलीचा शोध श्वान बेली हिने घेवुन गुन्हयाचे तपासकामी मदत केलेली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ५ | कोल्हापुर | स्टेला | १) पोहवा / ७१२ प्रदिप निवृत्ती सुर्वे<br>२) पोहवा/१५२८ पृथ्वीराज श्रीधर निंबाळकर | वडगाव पोलीस स्टेशन गु.र.नं. ३९३ / २०२४ भा.न्या.सं. कलम ३०९ (६) प्रमाणे सदरचा गुन्हा हा दि.१३/७/२०२४ रोजी ०३:२६ वाजता दाखल असून सदर गुन्हयाचे घटनास्थळावर अनोळखी इसमाची टोपी मिळून आली तिचा वास गुन्हेशोधक श्वान स्टेला हीस देवून सोडले असता ती घटनास्थळापासून शेतातुन सरळ पुर्व दिशेने काही अंतर जावुन रोडवर आली रोडवरून पुर्व दिशेने सरळ वाठार ते तळसंदे रोडने सुमारे ५०० मीटर अंतर जावुन रोडवर असलेले हॉटेल रेणुका समोर आजुबाजूस फिरून थांबली.<br>सदर मार्गदर्शनाच्या अनुषंगाने तपास केला असता संशयीत हॉटेलचा कर्मचारी सुरज संजय जाधव, वय २५ वर्षे रा.नवे चावरे, ता.हातकणंगले यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने गुन्हयाची कबुली दिली. अशा प्रकार श्वान स्टेला हीने गुन्हा उघडकीस येणेकरीता श्वान स्टेला हिने उपयुक्त मार्गदर्शन केलेले आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ६ | गोंदीया | बॉब<br>डॉबरमन | १) पोहवा/१४०३<br>विक्रमसिंग सादतकर | देवरी पोलीस स्टेशन गु.र.नं. २४९/२०२४ बी.एन.एस. कलम १०३ (१) सदर गुन्हयातील घटनास्थळावर श्वान बॉब यास संशयीत वस्तुचा वास देवुन सोडले असता तो वास घेत घेत क्रुपासागर गोपाले याचे घरामध्ये गेला आणि संशयीत इसम नामे नारायण कारू मुनेश्वर यास व त्याने गुन्हयात वापरलेला मुददेमाल शोधून दिला.<br>अशा प्रकारे श्वान बॉब व त्याचे हस्तकांनी सदर गुन्हा उघडकीस येण्याकामी महत्वपुर्ण कामगिरी बजावलेली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ७ | गोंदीया | बॉब डॉबरमन | १) पोहवा/१४०३ विक्रमसिंग सादतकर<br>२) पोकॉ/२०३७ रविंद्र शिवणकर | गोंदीया पोलीस स्टेशन गु.र.नं. ५२१/२०२४ बी.एन.एस. कलम १०३ (१) सदर गुन्हयातील घटनास्थळावर श्वान बॉब यास संशयीत वस्तुचा वास देवुन सोडले असता त्याने वास घेत घेत संशयीत इसम नामे लकी मेश्राम छोटा यास शोधून दाखविले.<br>अशा प्रकारे श्वान बॉब व त्याचे हस्तकांनी सदर गुन्हा उघडकीस येण्याकामी महत्वपुर्ण कामगिरी बजावलेली आहे. |



अशा प्रकारे माहे **ऑगस्ट २०२४** मध्ये श्वान पथकामार्फत खून - ०३, अपहरण - ०१, जबरी चोरी - ०२, अकस्मात मयत - १, असे एकूण - ०७ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.